२

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार**

**क्र. : मुमाआ/नों. क्र. ३११/१९/त. क्र. २५६/२१/०१**

**श्री. मॅथ्यू व्ही. थॉमस (तक्रारदार)**
बी-२०२, शिव ओम अपार्टमेंट सी.टी.एस.नं. ४३,
४३-सी-१ ते ८, चांदिवली फार्म रोड, स्टुडीओजवळ,
साकीनाका, मुंबई – ४०००७२.

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) एल विभाग**
एल विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, एल विभाग यांचे कार्यालय इमारत,
लक्ष्मणराव यादव मंडई, पहिला मजला, स.गो.बर्वे मार्ग,
कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०.

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एल विभाग**
एल विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, एल विभाग यांचे कार्यालय इमारत,
लक्ष्मणराव यादव मंडई, पहिला मजला, स.गो.बर्वे मार्ग,
कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०.

**खुलासा सुनावणी दिनांक : १३.०४.२०२२**

उक्त प्रकरणी दिनांक ०५.०३.२०२१ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:

"तक्रारदार यांनी दि. ०१.०९.२०१६ रोजी दाखल केलेल्या द्वितीय अपीलाबाबत अपील क्र.मुमाआ-२०१६/नों.क्र.५०१४/अपील क्र. ४१६३/२०१६/०१ नुसार (Drawing file no. CE/3876/BPES/AL) information of the Dates & year, if any kind of Permission granted by the BMC व इतर माहिती मागितली असून राज्य माहिती आयोगाने दि. २३.११.२०१६ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९.०३.२०१६ रोजी दिलेले उत्तर अस्पष्ट आहे. या प्रकरणात Amalgamation of Flat हा मूळ मुद्दा असून या मुदयाबाबत अपिलकर्ता यांना स्पष्ट व विहीक्षीत उत्तर दिनांक ३०.११.२०१६ रोजी पर्यंत जन माहिती अधिकारी यांनी पाठवावे. तथापि अद्याप माहिती मिळाली नसल्याने तक्रारदार यांनी दि. १५.०२.२०१९ रोजी आयोगापुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या दि. ०५.०३.२०१९ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती अद्याप तक्रारदार यांना मिळालेली नसल्याचे सांगितले.

दृकश्राव्य माध्यमाद्वारे आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. यास्तव तक्रारीची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. सदर तक्रारीची पुनर्सुनावणी **दिनांक ०९.०४.२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता** आयोजित करण्यात येत आहे. तरी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पुढील सुनावणीस माहितीसह उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील."

उक्त प्रकरणी दिनांक ०९.०४.२०२१ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:

"दृकश्राव्य माध्यमाद्वारे आजच्या पुनर्सुनावणीस तक्रारदार उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी दुसऱ्यांदा अनुपस्थित आहेत. यास्तव तक्रारीची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. सदर तक्रारीची पुनर्सुनावणी **दिनांक २८.०५.२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता** आयोजित करण्यात येत आहे. तरी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पुढील सुनावणीस माहितीसह उपस्थित राहावे. पुढील सुनावणीस उपस्थित राहिले नाहीतर त्यांच्याविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील."

दृकश्राव्य माध्यमाद्वारे आजच्या पुनर्सुनावणीस तक्रारदार उपस्थित असून त्यांनी विशद केले की, त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही.

आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी तिसऱ्यांदा अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी श्री. सागर करपे, सहाय्यक अभियंता (इ व का) एल विभाग यांनी तक्रारदार यांना आजपर्यंत माहिती का देण्यात आलेली नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) व कलम २० (२) अन्वये त्यांच्यावर कारवाई का करण्यात येऊ नये याबाबतचे स्पष्टीकरण आयोगात ३० दिवसाच्या आत सादर करण्यात यावे. जर ३० दिवसाच्या आत स्पष्टीकरण प्राप्त झाले नाहीतर त्यांना याबाबत काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन त्यांच्यावर पुढील कारवाई करण्यात येईल. या आदेशासह तक्रार निकाली काढण्यात येत आहे."

जन माहिती अधिकारी श्री. सागर करपे, सहाय्यक अभियंता (इ व का) एल विभाग यांनी आयोगात ३० दिवसात त्यांचे स्पष्टीकरण सादर करण्यात आले नाही.

तक्रारकर्ता यांना माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे व जाणीवपूर्वक विलंब केला असून कोणत्याही वाजवी कारणाशिवाय अक्षम्यपणे आणि सातत्याने माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी श्री. सागर करपे, सहाय्यक अभियंता (इ व का) एल विभाग यांनी तक्रारदार यांना माहिती दिली नाही. तसेच, उक्त आदेशानुषंगाने कोणताही खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७ चे स्पष्टपणे उल्लंघन केलेले आहे. **या प्रकरणातील वस्तुस्थिती व परिस्थिती लक्षात घेता, या प्रकरणात, जन माहिती अधिकारी श्री. सागर करपे, सहाय्यक अभियंता (इ व का) एल विभाग यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये रु. १०,०००/- एवढी शास्ती करण्यात येत आहे.**

सदरची शास्ती त्यांच्या मासिक वेतनातून **एका** हप्त्यात वसूल करण्यात यावी व शासन परिपत्रक सा.प्र.वि. दिनांक ०९.०५.२००७ व शासन सा.प्र.वि. शुध्दिपत्रक दिनांक २८.०५.२००७ मध्ये नमूद केलेल्या पुढील लेखाशीर्षाखाली जमा करावी.

०७०-इतर प्रशासनिक सेवा

६० इतर सेवा, ८०० इतर जमा रकमा

(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१).

शास्तीचा भरणा विहित मुदतीत करून आयोगाला अनुपालन अहवाल पाठवावा.

सहाय्यक आयुक्त, एल विभाग यांनी आयोगास आदेश प्राप्त झाल्यापासून दोन महिन्यांचे आत अनुपालन अहवाल सादर करावा. या आदेशासह तक्रार अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक : १३.०४.२०२२**

**(सुमित मल्लिक)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

प्रत: सहाय्यक आयुक्त, एल विभाग महापालिका कार्यालय इमारत, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत १ ला मजला, कुर्ला वेस्ट, मुंबई ४०००७० यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.

AARTI